**मे. विनय अलॉयज या कंपनीद्वारे प्लॉट नं. डी-१७, एमआयडीसी उमरेड, ता.उमरेड, जि.नागपूर या ठीकाणी २X६ एमव्हीए क्षमतेच्या सबमर्ज आर्क फर्नेस प्रतिष्ठापनेसह उच्च कार्बन मॅगनिज (२४००० टन प्रतीवर्ष) किंवा फेरो सिलिकॉन (७७५० टन प्रतीवर्ष) किंवा सिलिको मॅगनिज (१५५०० टन प्रतीवर्ष) किंवा पिग आयर्न (२४००० टन प्रतीवर्ष) चे एकतर किंवा एकत्रित उत्पादनासाठी प्रस्तावित प्रकल्पाच्या पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणीचे इतिवृत्त दि. १/०९/२०२१.**

*******

मे. विनय अलॉयज या कंपनीद्वारे प्लॉट नं. डी-१७, एमआयडीसी उमरेड, ता.उमरेड, जि.नागपूर या ठीकाणी २X६ एमव्हीए क्षमतेच्या सबमर्ज आर्क फर्नेस प्रतिष्ठापनेसह उच्च कार्बन मॅगनिज (२४००० टन प्रतीवर्ष) किंवा फेरो सिलिकॉन (७७५० टन प्रतीवर्ष) किंवा सिलिको मॅगनिज (१५५०० टन प्रतीवर्ष) किंवा पिग आयर्न (२४००० टन प्रतीवर्ष) चे एकतर किंवा एकत्रित उत्पादनासाठी प्रस्तावित प्रकल्पाची पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी दिनांक ०१/०९/२०२१ रोजी सकाळी ११.३० वाजता मे. विनय अलॉयज, प्लॉट नं. डी-१७, एमआयडीसी उमरेड, ता.उमरेड, जि.नागपूर येथे श्री. जगदीश कातकर, अतिरक्ति जिल्हादंडाधिकारी, नागपूर यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. श्री. अशोक करे, प्रादेशिक अधिकारी, नागपूर हे म.प्र.नि.मंडळाचे प्रतिनिधी तथा लोक सुनावणी समितीचे सदस्य होते व श्री.आनंद काटोले, उप-प्रादेशिक अधिकारी, नागपूर-२ यांनी समन्वयक म्हणून काम केले व अध्यक्षांच्या संमतीने सकाळी ११.३० वाजता पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीची कार्यवाही सुरू केली. पर्यावरण विषयक लोक सुनावणीच्या वेळी उपस्थित असलेल्या लोकांच्या नावांची यादी सोबत जोडत आहोत. **(सहपत्र-१).**

**पार्श्वभूमी**

मे. विनय अलॉयज यांनी डी-१७, एमआयडीसी उमरेड, ता.उमरेड, जि.नागपूर येथे २x६ एमव्हीए क्षमतेचया सबमर्ज आर्क फर्नेस (SAF) बसविण्याचा प्रकल्पाचा प्रस्ताव केला आहे. एकुण प्लाट क्षेत्र १९८०० वर्ग मीटर आहे. २x६ एमव्हीए क्षमतेचा सबमर्ज आर्क फर्नेस प्रतिष्ठापनेसह उच्च कार्बन मॅग्निज (२४०० टन प्रतीवर्श) किंवा फेरो सिलिकॉन (७७५० टन प्रतीवर्ष) किंवा सिलिको मॅग्निज (१५५०० टन प्रतीवर्ष) किंवा पिग आयर्न (२४००० टन प्रतीवर्ष) चे एकतर किंवा एकत्रित उत्पादन च्या EIA/EMP अहवाल तयार करण्याकरीता पत्र क्र. F No.J-११०११/१४/२०२१-IA.II (I) दिनांक ९ जानेवारी २०२१ द्वारे प्रमाणित विचारार्थ (TOR) जारी केले गेले.

**प्रयोजन व कार्यपध्दती**

उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, नागपूर-२ यांनी उपस्थितांचे स्वागत करून अध्यक्षांच्या परवानगीने लोकसुनावणीच्या कार्यवाहीची सुरवात केली.

श्री.जगदीश कातकर, अतिरक्ति जिल्हादंडाधिकारी, नागपूर व अध्यक्ष पर्यावरण विषयक लोकसुनावणी समिती, यांनी लोकसुनावणी घेण्याबाबतचा उद्देश व त्याची कार्यपध्दती समजावून सांगितली. या जाहिर लोक सुनावणीमध्ये घेण्यात येणाऱ्या आक्षेप/सूचना/टिका व टिप्पणी याची नोंद घेवुन शासनाकडे पाठविण्यात येणार असल्याचे सांगितले.

उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, नागपूर-२ यांनी भारत सरकारच्या वने व पर्यावरण मंत्रालयाच्या अधिसूचना क्र. **SO 60 (E) dtd. 27th Jan. 1994** व सुधारणा दिनांक १४ सप्टेंबर, २००६ नुसार लोकसुनावणी घेण्याचे प्रयोजन विशद आहे. तसेच त्यामधील तरतुदीनुसार दिनांक ३०/०७/२०२१ ला दैनिक हितवाद (इंग्रजी) व दैनिक सकाळ (मराठी) या दोन मोठ्या प्रमाणात वितरीत होत असलेल्या स्थानिक वृत्तपत्रात या पर्यावरण विषयक लोकसुनावणीबद्दल जाहीर सूचना प्रसिध्द करण्यात आले आहे त्याबद्दल कळविले. दैनिक वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या सुचनांच्या वृत्तपत्र कात्रणाची प्रत सोबत जोडली आहे. **(सहपत्र-२)**.

भारत सरकारच्या वने व पर्यावरण मंत्रालयाच्या अधिसुचने प्रमाणे प्रकल्पाची ठळक वैशिष्ठे असलेल्या, पर्यावरण आघात मुल्यनिर्धारण अहवालाच्या संक्षिप्त विवरणाची प्रत व इतर माहिती असलेले कागदपत्रे (इंग्रजी व मराठी मध्ये) विविध सरकारी कार्यालयात तसेच नगर परिषद/ग्रामपंचायत कार्यालयात नागरीकांच्या अवलोकनार्थ ठेवण्यात आलेले होते. जाहिर सूचना प्रसिध्द झाल्यापासून जाहिर सुनावणीच्या तारखेपुर्वी परिसरातील लोकांकडून लिखीत स्वरूपात सूचना, टीका-टिप्पणी व आक्षेप मागविण्यात आलेले हाते. जाहीर लोकसुनावणीच्या दिवसापर्यंत २ निवेदने/आक्षेप म.प्र.नि.मंडळाकडे ई-मेलद्वारे प्राप्त झाले आहे. तदनुसार, मंडळाचा आदेश क्र. ई-६८/२०२१ पत्र क्र. BO/JD/(WPC)/PH/B-210825-FTS-0103 dtd. 26.08.2021 नुसार लोक सुनावणी समिती गठीत करण्यात आली. या आदेशाची प्रत तसेच लोकसुनावणी पुर्वी / दरम्यान प्राप्त आक्षेप/निवेदन व समर्थनाच्या प्रती सोबत जोडत आहे. **(सहपत्र-३)**. ऑनलाईन पध्दतीने सुनावणी करीता वेबेक्स ॲपचा वापर करण्यात आला होता व याबाबत आयडी व पासवर्ड जाहिर करण्यात आले होते. परंतु ऑनलाईन पध्दतीने आक्षेप प्राप्त झाले नाही.

तद्नंतर उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, नागपूर-२ तथा समन्वयक यांनी प्रकल्प धारकाला प्रकल्पाबद्दल व पर्यावरणीय अहवालाबाबत विस्तृत सादरीकरण करण्यास सांगितले. तदनुसार, प्रकल्प धारकाच्या प्रतिनिधीने तपशिलवार स्थानिक भाषेत २X६ एमव्हीए क्षमतेच्या सबमर्ज आर्क फर्नेस प्रतिष्ठापनेसह उच्च कार्बन मॅगनिज (२४००० टन प्रतीवर्ष) किंवा फेरो सिलिकॉन (७७५० टन प्रतीवर्ष) किंवा सिलिको मॅगनिज (१५५०० टन प्रतीवर्ष) किंवा पिग आयर्न (२४००० टन प्रतीवर्ष) चे एकतर किंवा एकत्रित उत्पादनासाठी प्रकल्पाच्या पर्यावरण विषयक बाबींबाबत प्रकल्प परिसर, प्रस्तावित प्रकल्पाचे लाभ, प्रस्तावित सुविधा, अग्निशामक सुविधा, प्रक्रियेचे विवरण, वातावरणाची माहिती आणि अपेक्षित परिणामांची पडताळणी, जमिनीवरील घटक, वातावरण व हवामान, हवेतील घटक, परिसरातील हवेचा दर्जा, आपत्ती व्यवस्थापन योजना, हवा प्रदूषणाचे स्त्रोत, ध्वनी घटक, जल घटक, उपलब्ध पाण्याचा दर्जा, पाण्याचा वापर, सांडपाण्याची निर्मिती, जैविक घटक, सामाजिक आणि आर्थिक घटक, स्थानिक मूलभूत सोयीसुविधांवर होणार परिणाम, पर्यावरण व्यवस्थापन योजना, हवेतील उत्सर्जन, सांडपाणी व्यवस्थापन, वनीकरण कार्यक्रम, काळजी व्यवस्थापन आणि परिक्षण या बाबींवर सादरीकरण केले.

सादरीकरण झाल्यावर श्री.आ.नि.काटोले, उप-प्रादेशिक अधिकारी तथा समन्वयक यांनी उपस्थित नागरिकांना या प्रस्तावित प्रकल्पाबाबत आपले अभिप्राय, विचार, टिका, टिप्पणी व प्रश्न विचारण्याबाबत आव्हान केले. त्याप्रमाणे खालील नमुद लोकांनी आपले अभिप्राय, विचार, टिका, टिप्पणी व प्रश्न मांडले.

**जनसुनावणी दरम्यान चर्चेतील प्रश्न, टीका, टिप्पणी, आक्षेप, सुचना तसेच प्रकल्प धारकाने दिलेली उत्तरे/आश्वासने खालील प्रमाणे आहेत:**

**१) श्री. महेश मरगडे, सरपंच, ग्रा.प.धुरखेडा, ता.उमरेड,जि.नागपूर**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक/मप्रनि मंडळ यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| १ | कंपनीने पर्यावरणासाठी जास्तीत जास्त प्रमाणात वृक्षलागवड करावे, तसेच स्थानिक बेरोजगारांना रोजगार दयावा. | स्थानिक कुशल व अकुशल बेरोजगारांना प्राधान्याने रोजगार देण्यात येईल. तसेच स्थानिक अकुशल बेरोजगारांना योग्य प्रशिक्षण देवून रोजगार देण्यात येईल. |

**२) श्री. संदिप वासे, धुरखेडा**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक/मप्रनि मंडळ यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| १ | कारखान्यापासुन नागरीकांना हानी व शेतपिकांवर नुकसाना होणार काय | कारखान्यातील गॅसीयस धुळीकणांचे प्रमाण नगण्य राहील. त्यामुळे नागरीकांना व शेतीवर विपरीत परिणाम होणार नाही. प्रदूषणाकरीता बॅग फिल्टर ही हवा प्रदूषण नियंत्रण यंत्रणा बसविण्यात येईल. |

**३) श्री. एम. बच्चया, एनजीओ.**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक/मप्रनि मंडळ यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| १ | यांनी प्रकल्पास पाठींबा दर्शविला व निवेदन सादर केले. | --- |

**४) श्री. राजकुमार वासे, धुरखेडा.**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक/मप्रनि मंडळ यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| १ | कंपनीमध्ये बाहेरील लोकांना रोजगार न देता स्थानिक नागरीकांचाच रोजगारासाठी विचार व्हावा. | स्थानिक अकुशल बेरोजगारांना योग्य प्रशिक्षण देवून रोजगार देण्यात येईल. |
| २ | गावांमध्ये प्रदूषणाचा काही त्रास होणार नाही, याची कंपनीने खबरदारी घ्यावी. गावांतील विकासकामे करावी. | कारखान्यातील गॅसीयस धुळीकणांचे प्रमाण नगण्य राहील. त्यामुळे नागरीकांना व शेतीवर विपरीत परिणाम होणार नाही. प्रदूषणाकरीता बॅग फिल्टर ही हवा प्रदूषण नियंत्रण यंत्रणा बसविण्यात येईल. |

उप-प्रादेशिक अधिकारी, मप्रनि मंडळ, नागपूर-२ यांनी आर्क फर्नेसमधुन निघणाऱ्या वायु प्रदूषणाबाबत काय उपाययोजना केल्या आहेत याबाबत खुलासा करण्यासंबंधी सूचित केले. कंपनीच्या वतीने कळविण्यात आले की, वायु प्रदूषणाचे प्रमाण नगण्य असणार असुन बॅग फिल्टर ही हवा प्रदूषण नियंत्रण यंत्रणा प्रस्तावित असुन गरज असल्यास व्हेंन्चुरी स्क्रबर ही सुध्दा हवा प्रदूषण नियंत्रण यंत्रणा बसविण्याचे प्रयोजन आहे.

लोकसुनावणी समितीचे अध्यक्ष, श्री. जगदीश कातकर यांनी नागरीकांनी उपस्थित केलेल्या आक्षेप/सूचना याबाबत सर्व नोंद घेवून त्या सूचनांचे/आक्षेपांचे निवारण करण्याकरीता प्रकल्पधारकास सूचना दिल्या. तसेच सदर प्रकल्पाबाबत उपस्थित नागरिकांच्या प्रश्नांची व प्रकल्प प्रस्तावकांच्या उत्तराची उजळणी केली व उपस्थित जन समुदायाने शांतपणे आपले निवेदने मांडली व योग्य ते मुद्दे उपस्थित केले व त्यांची नोंद घेण्यात आल्याबाबत कळविले. पर्यावरण विषयक समितीचे अध्यक्ष, श्री. जगदीश कातकर यांनी सुनावणीचे सर्व समावेशक इतिवृत्त पर्यावरण विभागात पाठविले जाणार याबाबत उपस्थित नागरिकांना कळविले. पर्यावरण विषयक लोकसुनावणीचे समन्वयक श्री. आनंद काटोले यांनी सर्वांचे आभार व्यक्त केले. तसेच माननीय अध्यक्ष्यांच्या परवानगीने ही जाहिर लोकसुनावणी संपली असे जाहिर करण्यात आले.

**(आनंद काटोले)**
**उप-प्रादेशिक अधिकारी,**
**म.प्र.नि.मंडळ, नागपूर-२ व**
**समन्वयक, लोक सुनावणी समिती**

**(अशोक करे)**
**प्रादेशिक अधिकारी,**
**म.प्र.नि.मंडळ, नागपूर व**
**सदस्य, लोक सुनावणी समिती**

**(जगदीश कातकर)**
**अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, नागपूर व**
**अध्यक्ष, लोक सुनावणी समिती**